45

# "जागतिकीकरण–आदिवासी बोलीभाषा व समकालीन साहित्यातील स्थान"

पाथर्डी - २ फेब्रु. २०१९

*प्रा.डॉ. चंद्रसेन सा. आवारे*
*(मराठी विभाग प्रमुख),कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि. बीड.*

(3)

सध्याच्या जागतिकीकरणात आणि माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मराठी भाषा देखील 'ग्लोबल' झाली आहे. भारतासारख्या विकसनषील, प्रादेषिक असलेल्या देषात विविध जाती, धर्म, भाषा, संस्कृती अषी भिन्नता असल्यामुळे हे आव्हान मोठे स्वरूप धारण करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. षिक्षण, गुणवत्ता, मुक्त प्रदेष, रोजगारांच्या संधी, व्यावसायिक षिक्षण, स्वायत्तेची जबाबदारी, सम–समानता असे अनेक प्रष्न जागतिकीकरणात उभे असताना मातृभाषेतून षिक्षण हा ही एक प्रष्न आज निर्माण झाला आहे.

भाषा ही चैतन्यमयी वटवृक्षाप्रमाणे असते. तिला असंख्य पारंब्या फुटतात. मूळ धरून त्या जमिनीत रूजतात आणि वटवृक्ष उभा राहतो. जगातील कुठल्याही भाषेचा जीवंतपणा तिच्या अनेकांगी परिवर्तनषिलतेवर अवलंबून असतो. जागतिकीकरणामुळे भाषिक विविधतेला धोका निर्माण झाला असून अस्तित्वात असलेल्या मराठी भाषेचे, तिच्या विविध बोलीभाषेचे संवर्धन कसे करावे हा एक गंभीर प्रष्न बनला आहे.

खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण हे मुक्त अर्थव्यवस्थेचे मूलतत्त्व आहे. आपण हे मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण 1980 नंतर स्विकारले. अमेरिकेच्या दडपणाखाली आणि आपल्या देषातील धनाढ्यांच्या धोरणानुसार आपण हा स्विकार केला आहे. आता आपल्याला अन्य पर्याय नाही. ब्रिटिष काळात झालेल्या शोषणातून आपला देष अजून बाहेर पडलेला नाही. आदिवासींच्या वाड्यापर्यंत जाणारी पायवाट आपण अजून रूंद करू शकलो नाही. पालातील भटक्या–विमुक्तांच्या स्थिती व गतीमध्ये साधी स्थिरता देवू शकलो नाही. दलितांवरील अन्याय, अत्याचार अद्याप थांबलेले नाहीत. बलुतेदार, अलुतेदारांना या व्यवस्थेने निकामी केले आहे व दिवसेंदिवस हे वाढतच चालले आहे. आदिवासी साहित्य तर अजून समाजाच्या नीट पचनी ही पडलेले नाही. जागतिकीकरणाने होत जाणाऱ्या स्थित्यंतराचा वेध आदिवासी साहित्यातील कविता, कथा, कादंबरी, नाटक, वैचारीक लेख, ललित गद्य या साहित्यातून अधोरेखित करावा असा दिवस अद्याप आलेला नाही, याची खोलवर जाणीव मराठीत व्यक्त झालेली नाही, ती जाणीव यापुढे होणे गरजेचे आहे.

जागतिकीकरणाने ज्ञानयुग आणले. ज्याला मराठी समाजाची, मराठी भाषा व तिच्या बोली भाषेची काळजी आहे, अषांनी वेळीच सावध होणे ही काळाची गरज आहे. मराठी भाषिक, साहित्यिक माणसात खुप चांगूलपणा, उर्जा षिल्लक आहे. त्याच्या आधारे मराठी भाषा व बोलीभाषा, दलितांची भाषा, आदिवासींची भाषा कषी उभारी घेईल? यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत, तरच जागतिकीकरणात आपण व मराठी साहित्य टिकाव धरू शकेल. तेव्हा तिचे जतन, संवर्धन करण्याची जबाबदारी मराठी भाषिकांची व मराठी साहित्यिकांची आहे.

**आदिवासी बोलीभाषेचे स्वरूप :–**

आदिवासी जमातीला आपली स्वतंत्र्य भाषा आहे, त्याप्रमाणेच बोलीभाषाही आहे. परंतु स्वतंत्र अषी लिपी नाही. आदिवासी साहित्य मोठ्या प्रमाणात मौखिक स्वरूपात आज जीवंत आहे. ते एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत केले जाते. त्यांच्या जीवनातील सर्व व्यवहार या बोलीभाषेतून केले जातात. साहित्यात

आणण्यासाठी त्यांना स्वतंत्र अषी लिपी नसल्याने मोठा अडथळा निर्माण होतो. आदिवासींचे साहित्य खुंटले तरी आज महाराष्ट्रात खालील बोली बोलल्या जातात. महाराष्ट्र राज्यात आदिवासी लोकांचे वस्तीस्थान खालीलप्रमाणे दिसून येते, त्यावरून त्यांचे तीन विभाग पडतात.

- सह्याद्री विभाग – भिल्ल, कोकणा, वारली, ठाकर, कातकरी, मल्हार कोळी.
- सातपुडा विभाग – भिल्ल, कोकणा, गावीत, दुबळा, कोरकू, धनका, तडवी व पावरा.
- गोंडवणा विभाग – गोंड, माडीयागोंड, कोरकू, कोलाम, परधान व आंध

महाराष्ट्रात 23 जिल्ह्यातून 47 आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे. पण आज यातील काही जमाती नामषेष होत आहेत.

**बोलीभाषा :–**

आज भारतातील बोलीभाषांची निष्चित संख्या उपलब्ध नाही. त्यामुळे अधिकृत असा आकडा निष्चितपणे सांगता येत नाही. 'जॉर्ज ग्रिअर्सन' (1851–1841) यांच्या 'लॅग्विस्टीक सर्व्हे ऑफ इंडिया' खंड क्र. 9 मध्ये हैद्राबाद व म्हैसूर वगळून त्याबरोबरच मद्रासचा प्रदेष वगळून सर्वे करण्यात आला आहे. भारतात 179 भाषा बोलल्या जातात. 544 बोलीभाषा बोलल्या जातात. 1961 च्या जनगणनेनुसार भारतामध्ये 1652 भाषा बोलल्या जात होत्या. 2001 च्या जनगणनेनुसार भारतात 122 भाषा व 234 बोलीभाषा बोलल्या जात आहेत. 1961 च्या जनगणनेनुसार 10 हजार भाषिकांची संख्या घटलेली दिसून येते. मराठी भाषांमध्ये आदिवासी भाषा व बोलीभाषा मिळून 47 भाषा आज जीवंत आहेत. आदिवासींच्या बोली नष्ट होण्यामागची कारणे खालील प्रमाणे आहेत.

- आदिवासींच्या भौगोलिक स्थानात दळणवळणाची वेगवान साधने वाढल्याने आधुनिक जगाषी त्यांची ओळख होण्यास सुरवात झाली आहे.
- इंग्रजी भाषा व इंग्रजी ज्ञानाची ओळख होवून नवीन भाषेच्या संपर्काने आदिवासी आपली बोली विसरत चालला आहे.
- रोजगारांसाठी नागरी वस्तीचा संपर्क आल्याने नव्या भाषा आत्मसात केल्या जावू लागल्या आहेत.
- जागतिककरणामुळे आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण, भौतिक सुखवादाच्या लालसेतून नवीन भाषा षिकल्यामुळे आदिवासी संस्कृती नष्ट होत आहे.
- षिक्षणातून जागतिक ज्ञान भांडार आत्मसात करण्याची लालसा सुरू झाली आहे.
- आदिवासी जमातीची भाषा ही मौखिक परंपरेने जीवंत ठेवण्यासाठी लिपीची गरज असते पण स्वतःची लिपी नसल्याने त्या भाषेचे अस्तित्व संकटात आले आहे.
- आदिवासीमध्ये भाषिक संघटनेचा अभाव असल्याने व्यापक असा भाषिक प्रयत्नांचा अभाव दिसून येतो.
- शासकीय व्यवस्थेमध्ये छोट्या–छोट्या जनसमूहाच्या बोलींना मान्यता देवूनही सरकारी दरबारी याविषयी निरउत्साह असल्याने सदरील बोलींचा विकास होताना दिसून येत नाही.

**गोंडलिपी :–**

'कोयाबोली' या नावाने गोंड भाषांचा शब्दसंग्रह तयार करण्यात आला आहे. 'तिरू सिताराम मंडाले' यांनी पुस्तक रूपाने प्रसिध्द केला. 2001 मध्ये प्रकाषित करण्यात आलेल्या गोंड लिपीचा परिचय करण्यासाठी हाताने लेखन करण्यात आले. प्रा. मुकुंद गोखले यांनी गोंडलिपीचा अभ्यास केला. गोंड अक्षरांचे वळण भाषेच्या वळणाप्रमाणे नाही, तर त्यांच्या भाषेतील काही शब्दांची रचना 'मोहनजोंदडो' येथील चिन्हांषी मिसळताना दिसते. प्रा. गोखलेंनी केलेल्या टंकलेखनातून 2011 मध्ये पुस्तकाचे पुर्नः प्रकाषन करण्यात आले. गोंडलिपीतील मुद्रण जुळणीचा जागतिक क्षेत्रामधला हा पहिला प्रयत्न आहे. यासाठी संगणकाची मदत घेण्यात आली. या पध्दतीने गोंडलिपीची जगाषी ओळख झाली.

सांस्कृतिक क्षेत्राला आदिवासी जमातीचा मौलिक वारसा लाभला आहे. संगीत, चित्र या कलाकारांनी आधुनिक कालखंडात जागतिकीकरणाला आत्मसात करण्याचा प्रयत्न केला आहे. आदिवासी चित्रलिपीतून आपली भाषा बोलण्याचा प्रयत्न करतो, आपल्या अंगावर गोंदण करतो. आदिवासी लोकांची लोककला आज 'टॅटू' या नावाने ओळखली जावू लागली आहे. आज ही फॅषन संपूर्ण जगात सुरू झाली, याचे मूळ आदिवासी जमातीत पहायला मिळते.

साहित्यातून प्रभावीपणे जागतिकीकरणात आदिवासींची कला जगाच्या नकाषावर उषा किरण आत्राम यांनी प्रथम आणली.

"आम्ही नाहीत हिंदू, आम्ही आहोत कोयतूर ।
आमचा प्रकाष आम्हीच होवू" ।।

1997 ला 'म्होरकी' नावाचा कथा संग्रह त्यांनी लिहिला. या कथासंग्रहातून आदिवासी समाजाची ओळख झाली. त्यामधून डोंगर, दऱ्या, नदी, कपारीचे वर्णन केले आहे. आदिवासी भागात षिक्षणाचे लोण आल्याने त्यांच्या विचारांना सुरूंग लावण्याचे कार्य महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, कार्ल मार्क्स यांच्या विचाराने सुरू झाले. आपल्यातील क्षमता जगाला दाखवण्यासाठी आदिवासी साहित्यात परिवर्तन येवू लागले. या संबंधी उषा आत्राम म्हणतात,

"अगो बाय–मुळापासूनच अल्पाचारांचे हे झाड उपटून फेका या ।
इथे सूर्य शक्तीची स्त्री शक्ती वेली होवू या" ।।

जागतिकीकरणामुळे आदिवासी क्षेत्रातील आत्मभान, आत्मजागृती झाल्याने आदिवासींचे जीवन उध्दवस्त होण्यास सुरवात झाली. जागतिक बाजार पेठांनी त्यांच्या वस्तीस्थानावर आक्रमणे करून त्यांचा मालकी हक्क संपूष्टात आणला गेला. जंगल ही आदिवासींची मालकीची, हक्काची राहण्याची जागा, पण तीच आता नष्ट होवू लागली आहे. हे सत्य असताना काहीही आधुनिकतेच्या (विकासाच्या) नावाखाली आदिवासी संस्कृतीला विरोध करणाऱ्या लोकांना 'कुसूम आलम' फटकारताना दिसतात.

"तुम्ही भडवेगिरी केली । बलात्कार छेडछाड केली ।
कुंटणखाने चालविले । तरी तुमचे चालते..."

अषी आपली विद्रोहाची भाषा त्यांनी कवितेतून मांडली आहे.

शासकीय अधिकारी आदिवासी लोकांचे जीवन बदलण्याची भाषा करतात, पण ते छळ करून प्रसंगी मारहाण देखील करतात. यामध्ये प्रामुख्याने फॉरेस्ट अधिकारी, महसूल अधिकारी व पोलीस कर्मचारी यांचा समावेष

आहे. आदिवासींना लुटून किंवा मारून, कंगाल करून स्वतःच्या फायद्यासाठी आपल्या पदाचा वापर करताना दिसतात. हे दुःख बाबाराव माडवी आपल्या कवितेमध्ये मांडतात.

"आता आम्ही लाचारी पत्करून,
काही सांगणार नाही.
शोषण कर्त्याचे मुर्दे पाडल्याषिवाय थांबणार नाही."

आदिवासींना न्याय मिळाला पाहिजे, यासाठी ते विद्रोहाची भाषा बोलताना दिसतात.

**आदिवासी बोलीचे स्थान :–**

समकालीन साहित्यात आदिवासी बोलीचे स्थान काय? या प्रष्नांच्या अनुषंगाने विचार केला तर विविध प्रष्न आपल्या समोर निर्माण होतात. आदिवासींसाठी साहित्याच्या चर्चेला सुरवात होवून जवळपास 30 ते 35 वर्षांचा कालावधी लोटला आहे. आदिवासींच्या बोली व्यवस्थेचा अभ्यास हळूहळू सुरु झाला आहे. महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत विचार केला तर आंध्र, बैगा, बेरडा, दुबळा, कोरकू, गोंड, भिल्ल, वारली, कातकरी, परधान, ठाकर, महादेव कोळी इ. तत्सम 47 जातींच्या बोलीचा अभ्यास समकालात सुरू झाला आहे. मात्र त्याची प्रगती खुपच हळूहळू आहे. समकालीन साहित्यात आदिवासी बोलीचा विचार करताना त्या अभ्यास क्षेत्राभोवती अनेक प्रकारचे प्रष्न निर्माण झाले आहेत. मराठी आदिवासी साहित्य विचारात घ्यावयाचे झाले तर त्यांच्या कोणत्या कोणत्या पैलूंचा अभ्यास करावा हा महत्त्वपूर्ण प्रष्न आहे. समकालीन साहित्यात आदिवासी बोलींचा अभ्यास करताना आषय आणि अभिव्यक्तीच्या अनुषंगाने विचार करावा लागेल.

आदिवासी साहित्य निर्मितीचे कार्य अलिकडे मोठ्या प्रमाणात होवू लागले आहे. आदिवासी साहित्याच्या विकासाकरिता आदिवासी भाषांचे संवर्धन होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आदिवासीची समृध्द मौखिक परंपरा आदिवासी समाजमानाला स्वःत्वाचा साक्षात्कार होण्यासाठी या भाषांमधून वाङःमय निर्मितीच्या प्रयत्नांना प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. आदिवासी भाषांचा प्रादेषिक, प्रमाणभाषा बरोबर ताळमेळ घालण्याचे प्रयत्न अभ्यासकांच्या पातळीवर सुरू आहेत. त्यामुळे आदिवासी भाषेचे सामर्थ्य मोठे होवू शकते. भारतीय आदिवासी साहित्यांचा तुलनात्मक अभ्यास हळूहळू होवू लागला आहे. तसेच जगातील विविध देषातील आदिवासी साहित्याचा अभ्यास आज होवू लागला आहे. मानवी संस्कृतीच्या मुळाषी आदिवासी संस्कृती आहे हे स्पष्टच आहे. तसेच आदिवासी भाषा, बोली यांची भाषाकुले जागतिक पातळीवर कदाचित एकवंषीय असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे जागतिक साहित्य अभ्यासामध्ये मराठी आदिवासी साहित्य हे पायाभूत ठरण्याची शक्यता आहे.

**संदर्भ ग्रंथ :–**


- डॉ. प्रमोद मुनघाटे – आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप व समस्या
- डॉ. विनायक तुमराम – आदिवासी साहित्य : स्वरूप व समीक्षा – विजय प्रकाष, नागपूर
- माहेष्वरी गावीत – जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य – स्नेहवर्धन प्रकाषन, पुणे
- मुंढे सुमन – आदिवासी स्त्री जीवन – सुकावा प्रकाषन, पुणे

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com



VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ११. बोलीभाषा आणि साठोत्तरी वाङमयीन प्रवाह - आदिवासी

**प्रा. डॉ. चंद्रसेन सा. आवारे**
मराठी विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता. जि. बीड.

स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर मराठी साहित्य विश्वात विविध सामाजिक स्तरातील लेखकांनी साहित्य निर्मिती केलेली आहे. यामध्ये आदिवासी साहित्य प्रवाहाचा उगम महत्त्वपूर्ण ठरला आहे. कथा, कविता, कादंबरी, चरित्र—आत्मचरित्र, नाटक अशा विविध साहित्य प्रकारातून आदिवासी साहित्य निर्माण झाले. आदिवासी साहित्य या संकल्पनेने मराठी साहित्यात स्वतंत्रपणे ठसा निर्माण केला आहे. आदिवासी साहित्य म्हणजे काय? आदिवासी साहित्य नेमके कोणत्या गोष्टींमुळे आदिवासी साहित्य ठरते? याविषयी आदिवासी साहित्य संकल्पनेबाबत विविध अभ्यासकांच्या मतांचा परामर्श घेताना डॉ. यशवंत मनोहर यांनी भद्रावती येथील पहिल्या आदिवासी साहित्य संमेलनाच्या उद्घाटकीय भाषणात म्हटले की, "आदिवासी हे ह्या भूमीचे आदिपुत्र आहेत. गेल्या पाच हजार वर्षांपासून हा आदिवासी संस्कृतीच्या दारात भिकाऱ्यासारखा उभा आहे. येथील व्यवस्थेने गुलामगिरीची सर्पमाळा त्यांच्या गळ्यात घातल्या आहेत. भोवती निर्माण होत असलेले उच्चभ्रूंचे साहित्य हे ह्या आदिवासींचे नाही, आदिवासींच्या संबंधीचे नाही. रामाच्या चौदा वर्षांच्या वनवासाचे कौतूक करणाऱ्यांनी हजारो वर्ष वनात राहणाऱ्या या वनपुत्रांचे कधीच कौतूक केले नाही. जीवनातील खऱ्या वेदनांकडे पाठच फिरविली गेली आहे. म्हणून आजच्या उच्चवर्गीय साहित्यात ज्या वेदना आहेत, त्या खोट्या आहेत आणि खोट्या वेदनांचे गुणगाणही खोटेच आहे."[१]

डॉ. यशवंत मनोहर यांनी प्रस्थापित व्यवस्था आणि त्यांचे साहित्य यांनी आजपर्यंत साहित्य क्षेत्रात काय कामगिरी केली? त्या साहित्याने येथील आदिमाविषयी, त्यांच्या जीवनाविषयी, वास्तव्यविषयी साहित्यातून जीवनदर्शन घडविले नाही. सद्य:स्थितीत जे साहित्य निर्माण होते आहे; ते साहित्य मध्यमवर्गीय पांढरपेशांचे साहित्य आहे. वनांत राहणारा आदिवासी हा या व्यवस्थेने आपल्या साहित्याचा विषय कधी होवू दिला नाही. त्यामुळे आदिवासी साहित्य हे स्वत: आदिवासींनी हातात लेखणी घेवून निर्माण केले पाहिजे. एकंदरीत येथील सर्पमाळा व्यवस्थेला जाब विचारण्यासाठी आदिवासी साहित्य सक्षम असले पाहिजे, असे डॉ. यशवंत मनोहर यांच्या व्याख्येतून लक्षात येते.

'आदिवासी' म्हणजे आधी काळापासून वास्तव्य करणारे लोकसमूह. एखाद्या विशिष्ट भूप्रदेशातील मूळचे रहिवासी म्हणजे आदिवासी. महात्मा फुले त्यांना 'मूळ भूमीचे मालक' असे संबोधतात. भारतात अनादि काळापासून आपल्या स्वतंत्र्य जीवन शैलीने गिरी—कंदरात, निसर्गाच्या सानिध्यात जीवन जगणारे किती तरी आदिवासी समूह महाराष्ट्रात आढळतात. आर्यांच्या आक्रमणानंतर 'मात्र हे मूळ मालक असलेले आदिवासी समूह आपल्या भूमीला पारखे झाले; भूमिहीन झाले. स्वत:च्या पोटाची खळगी भरण्यासाठी अन्नाच्या शोधात जंगलात भटकत राहिले. आदिवासी साहित्याचे अभ्यासक डॉ. विनायक तुमराम लिहितात, "शेकडो वर्ष उलटून गेलीत, मात्र अनार्य आदिवासी रानावनात, गिरीकुहरात, जंगल जिव्हाऱ्यात टोळ्या—टोळ्यांनी आजही भटकताना दिसून येतो. दैत्य, पिशाच्च, राक्षस, असूर अशा अनेक उपरोधिक शब्दांनी या अनार्य जीवनाच्या

अस्तित्त्वाची नोंद वैदिक वाडमयात, रामायण व महाभारतात आढळते. रामायणातील भिल्लीन, शबरी आणि महाभारतातील एकलव्य या व्यक्तीरेखा भारतीय समाज जीवनात सहानुभूतीस व आदरास पात्र ठरल्या असल्या तरी त्यावरून समस्त आदिवासीबद्दल भारतीय समाजाला सहानुभती व आदर होता असे म्हणता येणार नाही. आज आदिवासी शब्द उच्चारताच आपणापुढे उभा राहतो तो प्रत्येक शतकाने छळलेला, नागवलेला अन् शेवटी जाणिवपूर्वक राना—कपारीत डांबला गेलेला असंघटीत माणूस. आपल्या स्वतंत्र्य परंपरासहीत हजारो वर्षापासून गावकुसांपासून दूर, किर्रर रानात जगणारा संदर्भहीन माणूस, निसर्ग निर्भर माणूस. एकेकाळी नेत्रदिपक राजकीय तथा सांस्कृतिक वैभवाने मिरविणारा कर्तृत्त्वान माणूस. परंतु वर्तमानात नुसता लाचार, अन्यायग्रस्त अन् पशु पातळीवरचे जीवन जगणारा माणूस.''[२] भारतीय आदिवासी हे एकेकाळी जंगलाचे राजे होते. पण धुर्त आर्यांनी छळ कपटांनी युध्दात हरवून त्यांना उपरे केले व रानावनात पाठविले. महात्मा फुले देखील आपल्या 'अखंड' मध्ये म्हणतात,

''शूर भिल्ल कोळी शराने तोडीले ।।
हाकलून दिले । रानावनी ।। ५ ।।
मंग महाअरी केले बहु जेर ।।
शिक्षा खडतर । आर्याजींची ।। ६ ।।''[३]

आदिवासी हे कोणी चोर, दरोडेखोर, राक्षस नसून भारतभूमीचे मूळ रहिवाशी आहेत हे प्रथम महात्मा फुले यांनी सांगितले. आर्यांनी शस्त्रास्त्रे चालवून मूळ भारतभूमीच्या मालकांना भटकंती करायला भाग पाडले. तरीही आदिवासी मूळ समूहांनी संस्कृती जतन केली. राज्ये सोडली तरीही आदिवासींनी आपली संस्की सोडली नाही, तर ती प्राणपणाने जपली. म्हणूनच आजही आदिवासींची स्वतंत्र्य भाषा आणि संस्कृती आपणास पहावयास मिळते.

स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींना थोड्या बहुत प्रमाणात शिक्षणाची दारे खुली झाली. कामापुरती शिकलेली माणसे आपल्या बांधवाचे अश्रू पुसण्यासाठी पुढे सरसावली. त्यातून काही चळवळी अधिक जोमाने वाढीस लागल्या. ह्या चळवळीचा इतिहास आणि त्यावर आधारीत ललीत साहित्याची निर्मिती, हा खरे म्हणजे आदिवासी साहित्याचा अमूल्य ठेवाच म्हणावा लागेल. क्रांतीकारकांप्रमाणे संघटनांच्या माध्यमातूनही प्रत्येक ठिकाणी आदिवासी साहित्य लिहिले जावू लागले. यासाठी प्रथम दलित साहित्याची मदत घेतली गेली. दुसरीकडे मात्र आदिवासी हे जंगल पहाडात स्वच्छंदी व सुखी जीवन जगतात, हा दृष्टीकोन असल्यामुळे त्यांच्या जीवनावर लिहिले गेलेले साहित्य हे वास्तवाला उतरणारे कसे असेल? ते रोमॅटिक स्वरूपाचे खोटे—नाटे, अवास्तव लिहिले गेलेले, जागतिक पातळीवरही असेच साहित्य निर्माण झालेले दिसते. मात्र मराठी साहित्यात आदिवासी जीवनाची पहिली दखल घेतली ती क्रांतीज्योती महात्मा फुले यांनीच. ते लिहितात,

''गोंड भिल्ल क्षेत्री होते मूळधनी ।
इराणी मागुनी आले येथे ।। (समग्र वाडमय, पृष्ठ क्र. ४९६)
शूर भिल्ल कोळी शराने तोडीले ।
हाकलून दिले रानीवनी ।।'' (समग्र वाडमय, पृष्ठ क्र. ४५७)

गोंड, भिल्ल आणि महादेव कोळी ह्या आदिम जमातींच्या आदिम वास्तव्यावर व त्यांच्या सामाजिक दुर्दशेवर महात्मा फुले यांनी प्रकाश टाकला आहे. आपल्या बांधवांनी अन्याय, अत्याचार आणि शोषणाविरूध्द आवाज उठवावा म्हणून संघ, परिषदा, प्रतिष्ठाण व शिक्षण संस्था प्रयत्नशील आहेत.

अशा या आदिम संस्कृतीचा जन्मच मुळात जंगलाच्या घनिष्ठ संबंधातून झाला. ती जन्मली, वाढली व विकास पावली ती जंगलातच. त्यामुळे त्यांचा तेथील वृक्ष—वेल्ली व प्राण्यांशी फार जवळचा संबंध आला. त्यातूनच त्यांना जंगलातील वनौषधीचे ज्ञान झाले, आणि म्हणूनच आदिवासी समाजाइतके झाडपाल्याचे औषधीचे ज्ञान इतर कोणत्याच समाजास असल्याचे दिसत नाही. एवढेच काय आदिवासींचे संगीत देखील जंगलातील पक्षाच्या बोलीभाषेतून तयार झालेले आहे. नाना प्रकारच्या पक्ष्यांच्या आवाजाचे सूर त्यांच्या संगीतात आजही दिसून येतात. शिवाय त्यांचे नृत्य, गीत, गायन व कला आदींचा संगम त्यांच्या सण व उत्सवात पहावयास मिळतो. अशी ही सांस्कृतिक मूल्ये हजारो वर्षापासून जतन करण्याचे काम आदिम स्त्री—पुरूषांनी केलेले आहे.

आदिवासी समाज निर्धन असेल, निरक्षर असेल पण तो असंस्कृत नाही, हे बिगर आदिवासी समाजाने प्रथम समजून घेतले पाहिजे. कारण की, आदिवासींना स्वतःची समृध्द व स्वतंत्र अशी संस्कृती आहे. त्यांच्या स्वतःच्या देव—देवता, सण—उत्सव, आचार—विचार, धर्म, कल्पना, रितीरिवाज, कला, संगीत व बोलीभाषा आहेत. त्यातील 'गोंडी' सारख्या भाषेला लिपी असून इतर भाषेचे प्रचलन मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होतांना दिसते. असा हा समृध्द संस्कृतीचा वारसा आदिम समाजाला लागला आहे.

मूळातच आदिवासींचे जगणे व मरणे हे जंगलाशी करकचून बांधले आहे. त्यामुळे निसर्गात घडणाऱ्या घडामोठी बाबत त्यांच्या मनात कमालीची भिती असते. त्या भितीतूनच त्यांच्या मनात भक्तीचा उगम झाला आणि इथूनच आदिवासी समाज खऱ्या अर्थाने निसर्ग पूजक बनला. निसर्ग हा फार शक्तीमान आहे. त्याच्याशी हाडवैर करता येत नाही, तर त्याच्याशी जवळीकता साधूनच जीवनाचा आनंद लुटता येतो, अशी आदिवासींची निसर्गाबद्दल आदराची भावना आहे. आदिमांची एवढी प्रगल्भ संस्कृती असताना आम्ही मात्र आज पाश्चात्त्य संस्कृतीचे गोडवे गातो, जगभर तिचा गवगवा करतो व आदिवासी संस्कृती उगडीनागडी म्हणून तिची अव्हेलना करतो.

जागतिकीकरणाचा मूळ हेतू 'आर्थिक विकास' असला तरी त्याचा सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रावरही विपरीत परिणाम घडून येत आहे. कारण खावूजी धोरणामुळे या देशातील शेतकरी, मजूर, भूमिहीन, दलित व ग्रामीण समाज कंगाल होत चालला आहे तर दुसरीकडे हजारो वर्षे दऱ्या—खोऱ्यात व डोंगर कपारीत वास्तव्य करून राहणारा व या भूमीचे जतन करणारा आदिवासी समाज आज विकास प्रक्रियेच्या बाहेर फेकला जात आहे. जल, जंगल व जमिनीवरील त्यांचा अधिकार संपुष्टात आला असून आज त्या ठिकाणी मोठ मोठे उद्योग स्थापन केले जात आहेत. त्यामुळे आदिवासीवर विस्थापित होण्याची वेळ येत आहे.

**आदिवासी बोलीभाषेचे स्वरूप**

आदिवासी जमातीला आपली स्वतंत्र्य भाषा आहे; त्याप्रमाणे बोलीभाषाही आहे. परंतु स्वतंत्र्य अशी लिपी नाही. आदिवासी साहित्य मोठ्या प्रमाणात मौखिक स्वरूपात जीवंत आहे. ते एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत केले जाते. त्यांच्या जीवनातील व्यवहार या बोलीभाषेतूनच केले जातात. साहित्यात

आणण्यासाठी त्यांना स्वतंत्र अशी लिपी नसल्याने मोठा अडथळा निर्माण होतो. आदिवासींचे साहित्य खुंटले तरी महाराष्ट्रात या खालील बोली आजही बोलल्या जातात. महाराष्ट्र राज्यात आदिवासी लोकांचे खालील प्रमाणे वस्तीस्थान दिसून येते. यावरून त्यांचे तीन विभाग पडतात.

१. **सह्याद्री विभाग** :— भिल्ल, कोकणा, वारली, ठाकर, कातकरी, मल्हारकोळी.

२. **सातपुडा विभाग** :— भिल्ल, कोकणा, गावीत, दुबळा, कोरकू, धनका, तडवी व पावरा.

३. **गोंडवण विभाग** :— गोंड, माडीयागोंड, कोरकू, कोलाम, परधान व आंध.

आदिवासी जमाती महाराष्ट्रात २३ जिल्ह्यातून ४७ जमातींचे वास्तव्य आहे. पण काही जमाती नामशेष होत आहेत. भारतातील बोलीभाषांची संख्या आज निश्चित उपलब्ध नाही. त्यामुळे अधिकृतपणे आकडा सांगता येणार नाही. 'जॉर्ज ग्रिअर्सन' (१८५१–१९४१) यांच्या 'लॅग्विस्टीक सर्व्हे ऑफ इंडिया' खंड क्रमांक ९ मध्ये हैद्राबाद आणि म्हैसूर ही संस्थाने वगळून सर्व्हे करण्यात आला आहे. भारतात १७९ भाषा बोलल्या जातात. ५४४ बोलीभाषा बोलल्या जात होत्या. १९६१ च्या जनगणनेनुसार भारतात १२२ भाषा व २३४ बोलीभाषा बोलल्या जात होत्या. १९६१ च्या जनगणनेनुसार १० हजार भाषिकांची संख्या घटलेली दिसून येते. मराठी भाषामध्ये आदिवासी भाषा, बोलीभाषा एकूण ४७ भाषा जीवंत आहेत.

**आदिवासींची बोलीभाषा**

आदिवासी साहित्यात बोलीभाषेशिवाय साहित्य येणार नाही. बोली प्रचूर आहेत, वाक्यप्रचार ही सहजपणे यातून मांडले जातात. त्यांच्या बोलीभाषेत स्वभाव विशेषणांचा व प्रतिमांमधून आपले भाव विश्व प्रगटतांना दिसते. निसर्गावलंबीपणा त्याला आवडतो, पण जागतिकीकरणाचे लोण निसर्गावर आले आहे. जंगले नष्ट होवून सिमेंटची जंगले उभी राहत आहेत. आदिवासींचा निसर्गाच्या सहवासातील स्वच्छंदीपणा पुढे आणणे गरजेचे आहे. यासाठी आदिवासींच्या बोलीभाषेत साहित्य निर्मिती होणे गरजेचे आहे. आदिवासी भाषांच्या विकासाबरोबरच भाषेच्या संवर्धनाची गरज आहे.

आदिवासींच्या बोलीभाषा मूळातच व्याकरणबध्द आहेत. फक्त त्यात विशिष्ट रचनेचा व नियमांचा अभ्यास अभ्यासकाला कराला लागेल. त्या–त्या आदिवासींच्या बोलीभाषेतील लोकसाहित्य भारतीय लोक–संस्कृतीच्या ग्रंथाचे एक अनमोल असे सुवर्णपत्र आहे. त्यात आदिवासींच्या लोक–संस्कृतीतील भाव–भावना, आलंकारीकता, कल्पना वैभव, वैचारिक समृध्दी, गेयता व लालित्य इ. गुणविशेष दिसून येतात. आदिवासींनी आपली बोलीभाषा सजविण्यासाठी कोणतेही विशेष असे प्रयत्न केले नाहीत, तर ती बोली मूळातच सुंदर आहे. या अनुषंगाने आदिवासींच्या बोलीभाषेसाठी काय करता येईल? असा विचार केला तर दोन गोष्टी निश्चितपणे करता येतील.

१. आदिवासींच्या बोलीभाषेचे व त्यातील लोकसाहित्याचे संकलन व संवर्धन करणे.

२. आदिवासी बोलीभाषेच्या विकासासाठी या बोलीभाषांचा योग्य तो वापर करणे.

कोठारी कमिशनने प्रत्येकी दुसऱ्या वर्गापर्यंत आदिवासी बोलीत पुस्तके लिहावीत, अशी शिफारस केली होती. म्हणजे त्या त्या आदिवासी जमातींना त्यांच्या बोलीभाषेतून शिक्षण द्यावे असा दृष्टीकोन त्या पाठीमागचा होता. या संदर्भात डॉ. शैलजा देवगांवकर म्हणतात, ''एवढ्यावर थांबून चालणार नाही तर

विद्यापीठ स्तरावर या आदिवासी बोलीभाषांचा अभ्यास व्हायला हवा. अशा प्रकारचा प्रयत्न सन १९७८–८० च्या सुमारास सिनेटमध्ये श्री. व्यंकटेश आजाम यांनी केला होता. विदर्भापुरते बोलायचे झाल्यास गोंड, परधान, कोलाम, कोरकू, बंजारा इ. जमातीचे लोकसाहित्य उपलब्ध आहे, प्रकाशित झाले आहे. त्यामुळे विद्यापीठ स्तरावर अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथाची उणिव भासणार नाही.''[४] आजही आदिवासींच्या बोलीभाषेचा, संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र विद्यापीठाची मागणी सतत जोर धरत आहे.

आदिवासी साहित्यात आज **काव्य, कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथन व ललित** गद्य या वाडमय प्रकाशन विपूल प्रमाणात साहित्य निर्मिती झाली आहे, व होत आहे. वाहरू सोनवणे–'गोधड', विनायक तुमराम–'गोंडवन पेटले आहे', भुजंग मेश्राम–'उलगुलान', वामन शेळमाळे–'जग वामने पेटवा मशाली', गोविंद गारे–'अनुभूती', सुनिल कुमरे–'तिरकामठा' इत्यादी कवी आदिवासींच्या जीवनाचे चित्र कवितेतून रेखाटताना दिसतात. वाहरू सोनवणे आपल्या 'डाग' या कवितेत म्हणतात,

''त्या ठिकाणी अंधार जमलेला, तुंबलेला
उंच गेलेल्या इमारतींना उजेड देणाऱ्या
त्या दिव्यांची मी तुलना करतो.''

उंच इमारतींना चंद्र उजेड देतो, पण अज्ञानी, दारिद्र्यात खिचपत असलेल्या आदिवासींना प्रकाश देत नाही. चंद्रावरील डाग आणि आदिवासींची अंधारलेली झोपडी ही तुलना दोन जगाचे दर्शन घडविणारी आहे. जागतिकीकरणात आहेरे आणि नाहीरे या दोन जगातील संघर्ष वाढतच जाणार आहे. भूजंग मेश्राम या आदिवासी कवीने आदिवासींच्या दुःख, दारिद्र्या बरोबरच आदिवासी स्त्री आपल्या शीलाचे रक्षण कशा प्रकारे करते, याचे दर्शन घडविले आहे. आदिवासी स्त्री शेतात शेतीकाम करण्यासाठी गेल्यावर चारित्र्याला दंश करणाऱ्या पाटलाची बोटं ती आपल्या जवळच्या विळ्याने छाटते, याचे वर्णन भूजंग मेश्राम करतात, ते असे,

''मी खोचला पदर, उपसला इळा
आन् त्येचे बोटचं ठेवले नाही हातावर्ती''

असाच विद्रोही बाणा बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या जुलूमाविरूध्द सर्व शोषितांना दाखवावा लागणार आहे आणि हा संघर्ष सतत सुरू राहणार आहे. आदिवासी कवींनी वेदना, विद्रोह आणि नकाराचे सूत्र आपल्या कवितेतून चित्रित केले आहे.

आदिवासी लेखकांनी **कादंबरीचेही** लेखन केलेले आहे. नजुबाई गावीत, प्रा. माधव सुरकंडे, बाबाराव मडावी यांनी आपल्या कादंबरीतून आदिवासींचे जीवन स्वरूप चित्रित केले आहे. 'तृष्णा' ही नजुबाई गावीत यांची कादंबरी आहे. आदिवासींच्या लोक–जीवनाचा, रूढी–परंपरांचा, दारिद्र्याचा त्यांनी कादंबरीतून वेध घेतला आहे. 'वाडा' ही आदिवासी व जमीनदार यांच्यातील संघर्षावर प्रकाश टाकणारी प्रा. माधव सरकुंडे यांची कादंबरी आहे. या कादंबरीतील ग्यानबा पाटील राघोबा अंथाला म्हणतो, ''बरी अंथाडे हो ! कर्ज नेतानी लाज वाटत नाही, अन् देतांनी चावळ्या–बावळ्या करता. तुमच्या गांडीचे वेतानं कातडे काढायला पायजे. सांग मादरचोदा, कव्हा वापस करतू मव्हं कर्ज?'' असे ग्यानबा पाटील समाजात कालही होते व आजही आहेत. जागतिकीकरणात असे आदिवासींचे शोषण करणारे पाटील जन्मणार यात शंका नाही. 'टाहो' ही कादंबरी बाबाराव मडावी यांनी लिहिली आहे. या कादंबरीतील नायक 'भिमा' हा आदिवासी बांधवांना सुधारण्यासाठी

विद्यापीठ स्तरावर या आदिवासी बोलीभाषांचा अभ्यास व्हायला हवा. अशा प्रकारचा प्रयत्न सन १९७८–८० च्या सुमारास सिनेटमध्ये श्री. व्यंकटेश आजाम यांनी केला होता. विदर्भापुरते बोलायचे झाल्यास गोंड, परधान, कोलाम, कोरकू, बंजारा इ. जमातीचे लोकसाहित्य उपलब्ध आहे, प्रकाशित झाले आहे. त्यामुळे विद्यापीठ स्तरावर अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथाची उणिव भासणार नाही.''[४] आजही आदिवासींच्या बोलीभाषेचा, संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र विद्यापीठाची मागणी सतत जोर धरत आहे.

आदिवासी साहित्यात आज **काव्य, कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथन व ललित गद्य** या वाडमय प्रकाशन विपूल प्रमाणात साहित्य निर्मिती झाली आहे, व होत आहे. वाहरू सोनवणे–'गोधड', विनायक तुमराम–'गोंडवन पेटले आहे', भुजंग मेश्राम–'उलगुलान', वामन शेळमाळे–'जग वामने पेटवा मशाली', गोविंद गारे–'अनुभूती', सुनिल कुमरे–'तिरकामठा' इत्यादी कवी आदिवासींच्या जीवनाचे चित्र कवितेतून रेखाटताना दिसतात. वाहरू सोनवणे आपल्या 'डाग' या कवितेत म्हणतात,

''त्या ठिकाणी अंधार जमलेला, तुंबलेला
उंच गेलेल्या इमारतींना उजेड देणाऱ्या
त्या दिव्यांची मी तुलना करतो.''

उंच इमारतींना चंद्र उजेड देतो, पण अज्ञानी, दारिद्र्यात खिचपत असलेल्या आदिवासींना प्रकाश देत नाही. चंद्रावरील डाग आणि आदिवासींची अंधारलेली झोपडी ही तुलना दोन जगाचे दर्शन घडविणारी आहे. जागतिकीकरणात आहेरे आणि नाहीरे या दोन जगातील संघर्ष वाढतच जाणार आहे. भूजंग मेश्राम या आदिवासी कवीने आदिवासींच्या दुःख, दारिद्र्या बरोबरच आदिवासी स्त्री आपल्या शीलाचे रक्षण कशा प्रकारे करते, याचे दर्शन घडविले आहे. आदिवासी स्त्री शेतात शेतीकाम करण्यासाठी गेल्यावर चारित्र्याला दंश करणाऱ्या पाटलाची बोटं ती आपल्या जवळच्या विळ्याने छाटते, याचे वर्णन भूजंग मेश्राम करतात, ते असे,

''मी खोचला पदर, उपसला इळा
आन् त्येचे बोटचं ठेवले नाही हातावर्ती''

असाच विद्रोही बाणा बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या जुलूमाविरूध्द सर्व शोषितांना दाखवावा लागणार आहे आणि हा संघर्ष सतत सुरू राहणार आहे. आदिवासी कवींनी वेदना, विद्रोह आणि नकाराचे सूत्र आपल्या कवितेतून चित्रित केले आहे.

आदिवासी लेखकांनी **कादंबरीचेही** लेखन केलेले आहे. नजुबाई गावीत, प्रा. माधव सुरकंडे, बाबाराव मडावी यांनी आपल्या कादंबरीतून आदिवासींचे जीवन स्वरूप चित्रित केले आहे. 'तृष्णा' ही नजुबाई गावीत यांची कादंबरी आहे. आदिवासींच्या लोक–जीवनाचा, रूढी–परंपरांचा, दारिद्र्याचा त्यांनी कादंबरीतून वेध घेतला आहे. 'वाडा' ही आदिवासी व जमीनदार यांच्यातील संघर्षावर प्रकाश टाकणारी प्रा. माधव सरकुंडे यांची कादंबरी आहे. या कादंबरीतील ग्यानबा पाटील राघोबा अंथाला म्हणतो, ''बरी अंथाडे हो ! कर्ज नेतानी लाज वाटत नाही, अन् देतानी चावळ्या–बावळ्या करता. तुमच्या गांडीचे वेतानं कातडे काढायला पायजे. सांग मादरचोदा, कव्हा वापस करतू मव्हं कर्ज?'' असे ग्यानबा पाटील समाजात कालही होते व आजही आहेत. जागतिकीकरणात असे आदिवासींचे शोषण करणारे पाटील जन्मणार यात शंका नाही. 'टाहो' ही कादंबरी बाबाराव मडावी यांनी लिहिली आहे. या कादंबरीतील नायक 'भिमा' हा आदिवासी बांधवांना सुधारण्यासाठी

प्रयत्न करतात, तसे विचार कादंबरीमधून मांडतात. आदिवासींचा हा जागल्या बाबाराव मडावी यांनी जीवंतपणे रेखाटला आहे. आदिवासी नसलेल्या लेखकांनी देखील आदिवासींच्या जीवनातील प्रश्नांना आपल्या कादंबरीमधून वाचा फोडली आहे.

**नाट्यलेखनात** ही आदिवासी वाडमय मागे नाही. गोंडी भाषेतील 'सोनेताकुर्स' हे नाटक तोडसाम यांचे असून 'महासूर्य बिरसा'—दशरथ मडावी, 'महाबिरसा'—प्रा. वामन शेळके यांनीही नाटकाव्दारे नाट्य—वाडमयाला एक मौलिक देणगीच दिली आहे. भूजंग मेश्राम यांनी 'सवारी', 'औतान', 'मातामाय' व 'सोंग' ह्या एकांकिका लिहिल्या आहेत. आदिवासी लेखकांनी **कथालेखन** ही केले आहे. उषाकिरण आत्राम यांचा 'अहेर' व प्रा. माधव सरकुंडे यांचा 'सर्वा' हे कथासंग्रह आदिवासीच्या व्यस्थांना वाचा फोडतात. डॉ. गोविंद घारे यांनी 'आदिवासींचे प्रश्न आणि परिवर्तन', 'आदिवासींचे शिक्षण' इत्यादी वैचारिक ग्रंथ लिहिले आहेत. काव्य, कथा, कादंबरी, नाटक, एकांकिका या साहित्य प्रकारातून आदिवासी प्रतिभावंतांनी विपूल प्रमाणात लेखन केले आहे. त्यामुळे आदिवासी साहित्य हा 'सवतासुभा' आता सर्वांना सुपरिचित झाला आहे.

**संदर्भ**

१. गारे गोविंद (संकलन) — 'आदिवासी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणे' — उद्घाटन भाषण : पहिले आदिवासी साहित्य संमेलन, भद्रावती, जि. चंद्रपूर, दि. १०, ११ डिसेंबर १९८९, सुगावा प्रकाशन, पुणे.

२. तुमराम विनायक — आदिवासी साहित्य (लेख) — 'साठोत्तरी मराठी वाडमयातील प्रवाह' — संपा. शरणकुमार लिंबाळे (संपा) उद्धृत दिलीपराज प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे—३०, प्रथम आवृत्ती जून—२००७, पृ.क्र. २१६—२१७.

३. फुले ज्योतीराम गोविंदराव — अखंड दि काव्यरचना — उद्धृत, महात्मा फुले समग्र वाडमय, संपा. धनंजय कीर, म.गं.मालशे, आणि य.दि. फडके, सचिव म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई—४०००३२, सुधारीत सहावी आवृत्ती, नोव्हेंबर—२००६, पृ.क्र. ५७६.

४. डॉ. शैलजा देवगांवकर — 'आदिवासींचे विश्व' — पृ.क्र. १९३.

जवाहर एज्युकेशन सोसायटीचे

# वैद्यनाथ कॉलेज

परळी-वैजनाथ जि.बीड

## मराठी विभाग आयोजित

## ।। राष्ट्रीय चर्चासत्र ।।

दिनांक : ०९ मार्च २०१९

प्रा. डॉ. चंद्रसेन सा. आवारे , कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा जि.बीड यांनी "मराठी बोलीभाषा आणि साहित्य : सामाजिक, सांस्कृतिक व प्रादेशिक संदर्भ" या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये तज्ज्ञ शोधनिबंधवाचक / सहभागी प्रतिनिधी म्हणून सक्रिय योगदान दिल्याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

शोधनिबंधाचा विषय: बोलीभाषा आणि साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाह आदिवासी

संयोजक

| | | |
|---|---|---|
| प्रा.अर्चना चव्हाण | प्रा.रो.अ.घाटे | डॉ.आर.के.इप्पर |
| मराठी विभाग प्रमुख | मराठी विभाग | प्राचार्य |